ePaper


## शिंदे, पवारांशी युती, तरीही भाजपला भीती; ठाकरेंना शह देण्यासाठी मनसेशी दोस्ती!



| वर्ष - 7 | अंक - 274 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत


- पुजाराने झळकावले दमदार शतक
- राधिकाचा 'तो' व्हिडीओ व्हायरल
- कमलनाथ भाजपाच्या वाटेवर?
- मराठा आंदोलकांना धक्का?


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 18 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# रायगडमध्ये भाजपाविरुद्ध राष्ट्रवादी!

## अजित पवारांची जाहीर सभेत घोषणा; तुमच्या मनातील उमेदवार मिळणार!

### भाजपच्या गोटात खळबळ?
### सारखं मुख्यमंत्री, मुख्यमंत्री काय... बाबांनो जरा कळ सोसा : अजित पवार

। अलिबाग । महाईन्यूज

**रायगड लोकसभा मतदार संघाची जागा राष्ट्रवादी मिळणारअसून तुमच्या मनातील उमेदवार दिला जाणार आहे असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रायगड जिल्ह्यात म्हसळा येथे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खा. सुनील तटकरे यानाच तिकीट मिळणार असल्याचे संकेत दिले आहेत. रायगड जिल्ह्यात लोकसभा मतदार संघात भाजपने दावा केला असून तसे कार्यकर्ते मेळावे जिल्ह्यात भाजपा घेत आहे. मात्र अजित पवार यांच्या संकेतामुळे जिल्ह्यात भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी वाद वाढणार काय असा प्रश्न पडला आहे.**

म्हसळा येथील ४३ कोटी रुपये खर्चाच्या म्हसळा शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पाचे भूमिपुजन आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी खा. तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे,आ. अनिकेत तटकरे,जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस चे अध्यक्ष मधुकर पाटील आदी उपस्थित होते.

राज्यातील सर्व ४८ जागा निवडण्याचा आणि त्या जिंकून आणण्याचा निश्चय केला असल्याचे ना. अजित पवार यांनी यावेळी सांगून ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळणार आहे व तुमच्या मनातील उमेदवार इथे दिला जाणार असल्याचे म्हटले. मात्र अजित पवार यांच्या वक्तव्यामुळे भाजपाच्या गोटात खळबळ उडाली आहे.



काही दिवसांपूर्वीच पाली सुधागड येथे झालेल्या भाजपा कार्यकर्त्या मेळाव्यात खा.तटकरे यांच्यावर भाजपच्या नेत्यांनी टीका केली होती व रायगडमध्ये लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने दावा केला होता. त्यानंतर रायगड मधील राजकीय परिस्थिती वेगळी असून राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे यांनीच लोकसभा निवडणूक लढवली पाहिजे. रायगडच्या विकासाच्या दृष्टीने खा. तटकरे हेच लोकसभा उमेदवार पाहिजेत अशी आग्रही मागणी शिवसेनेचे शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांनी अलिबाग येथे केले व राष्ट्रवादीच्या खा. तटकरे यांच्या लोकसभा उमेदवारीचे समर्थन केले होते. या पार्श्वभूमीवर महायुती मधील वरिष्ठ नेते रायगड लोकसभा मतदार संघाबद्दल काय भूमिका घेतात याकडे रायगडकरांचे लक्ष लागले आहे. अजित पवार यांनी सांगितले कि शिवजयंती निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शिव स्वराज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून खा.सुनील तटकरे यांनी ह्या छत्रपती शिवरायांच्या भूमीत राष्ट्रवादी पक्ष हा वाढवला, असून त्यांच्या सोबत असंख्य कार्यकर्ते यांनी त्यांना भक्कम अशी साथ दिली म्हणून आज रायगडमध्ये आपल्या पक्षाची नाळ ही गावा-गावात जोडली गेली असल्याचे पवार यावेळी म्हणाले.

रायगड जिल्ह्याच्या दक्षिण लोकसभा मतदारसंघातून भाजपचे धैर्यशील पाटील तर उत्तर रायगड मधून भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी रायगड जिल्ह्यात भाजपच्या कार्यकर्त्यांनी केली असून त्यांनी रायगड लोकसभा मतदारसंघावर दावा केला आहे.

### रायगड मधील राजकारणाला वेगळे वळण

**माजी आमदार धैर्यशील पाटील यांना रायगड मधून लोकसभेची उमेदवारी देण्याचे आश्वासन भाजपच्या पक्ष श्रेष्ठींनी दिल्यानंतर त्यांनी शेकापला राम राम ठोकून भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांच्याकडे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष पद दिले गेले. यामुळे संभाव्य लोकसभा उमेदवारी गृहीत धरून त्यांनी दक्षिण रायगड मधील लोकसभा मतदार संघात कार्यकर्ता भेटीघाटी व लोकसंपर्क वाढवला आहे. दरम्यान राष्ट्रवादीतील अजित पवार यांचा एक गट राज्याच्या राजकारणात आल्याने व पुन्हा आदिती तटकरे यांना मंत्रीपद दिल्याने रायगड मधील राजकारणाला वेगळे वळण लागले आहे.**

# 'मोदी सरकारच्या योजना या लोककल्याणकारी'!

## दीपक मोढवे-पाटील निगडीतील प्रभाग 13 मध्ये 'गाव चलो अभियानास'

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली यशस्वीपणे वाटचाल करणारे केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. त्याचा सर्वसामान्य नागरिकांना लाभ होत आहे, अशा भावना भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दिपक मोढवे-पाटील यांनी व्यक्त केल्या.**

पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शहरामध्ये 'गांव चलो अभियान' सुरू आहे. त्याच माध्यमातून पिंपरी-चिंचवड शहर भाजपा वाहतूक आघाडीच्या वतीने वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे पाटील यांच्या नेतृत्वाखाली निगडीतील प्रभाग क्रमांक १३ मध्ये 'गाव चलो अभियान' राबवण्यात आले. यावेळी मोढवे पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या. मोदी सरकारच्या योजना या लोककल्याणकारी आहेत. या अभियानाच्या माध्यमातून होत असलेली जनजागृती हा एक स्तुत्य उपक्रम आहे, अशा भावना अनेकांनी भेटी दरम्यान व्यक्त केल्या. अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नवमतदार,



ज्येष्ठ कार्यकर्ते, समाजातील प्रतिभावंत व्यक्ती आदींची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला, अशीही माहिती दीपक मोढवे पाटील यांनी दिली. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचे १० वर्षांतील प्रभावी कार्य, उत्तम संघटनात्मक बांधणी, जाहीरनाम्यातील आश्वासनांची केलेली पूर्ती, विकसित भारताचा संकल्प सांगणाऱ्या यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पातील ठळक तरतुदी ही सर्व माहिती 'गाव चलो अभियान'मधून लोकांपर्यंत पोहोचविण्यात आली. लाभार्थ्यांना मिळालेल्या योजनांची माहिती घेतली; तांत्रिक कारणामुळे लाभ न घेऊ शकलेल्यांना त्याची पूर्तता करून योजनेंचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

> "देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून विविध विकास योजनांचा लाभ समाजातल्या अंत्योदय घटकापर्यंत पोहोचला. देशाची अर्थव्यवस्था जगामध्ये पाचव्या क्रमांकावर आली आहे. विकसित राष्ट्र म्हणून भारताची जडणघडण होत असून जगातील सामर्थ्यवान देश म्हणून भारताचा देशवासीयांना अभिमान आहे." **–दीपक मोढवे-पाटील,** शहराध्यक्ष, वाहतूक आघाडी, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# भाजपचे आमदार, खासदार आमच्यासोबत

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचा खळबळजनक दावा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपचे काही विद्यमान आमदार आणि खासदार काँग्रेस सोबत असल्याचा खळबळजनक दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. ज्यावेळी आम्ही हातोडा मारू तेव्हा तुम्हाला दिसेलच असं त्यांनी म्हटलं आहे. नाना पटोले हे लोणावळ्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. मुंबईत लोकसभेच्या तीन जागा मागितल्या असल्याचा त्यांनी उल्लेख केला असून जागा वाटपाचा विषय लवकरच संपवणार आहोत. असे देखील त्यांनी म्हटले आहे.**



दरम्यान, लोणावळ्यातील काँग्रेसच्या शिबिरात सात आमदार गैरहजर होते. याबाबत देखील त्यांनी खुलासा केला आहे.नाना पटोले म्हणाले, काही वैयक्तिक कारणामुळे लोणावळ्यातील शिबिरात काही आमदार येऊ शकले नाहीत. गैरहजर असलेल्या आमदारांची संख्या सात आहे. गैरहजर पदाधिकारी आणि आमदार यांना कारणे दाखवा नोटीस बजावणार आहोत. सध्या काँग्रेस पक्षातून भाजपात काही जण जाणार असल्याची शक्यता असल्याचा प्रश्न पत्रकरांनी विचारल्यानंतर, पटोले म्हणाले की, काँग्रेस पक्षाला कोण येतंय आणि कोण जातंय याने फरक पडत नाही. नवीन मतदार हे राहुल गांधींचे चाहते आहेत. तरुणांचे आयुष्य मोदींनी उध्वस्त केलं. त्यामुळे ही तरुण पिढी महाविकास आघाडीच्या पाठीशी असल्याचे ठाम मत पटोले यांनी व्यक्त केले. पुढे ते म्हणाले, काँग्रेस पक्षाचा आगामी लोकसभेसाठी सर्व्हे सुरू झाला आहे. आम्ही जिंकणाऱ्या उमेदवाराला उमेदवारी देणार आहोत. मेरीटच्या आधारे निर्णय घेणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केले. पुढे ते म्हणाले, महाराष्ट्रात भाजप दोन जातीत भांडण लावून देत आहे. समाजात तेढ निर्माण करत आहे. शाहू फुलेंचा विचार संपवण्याचे पाप याच भाजपने केलं आहे. यांची सत्तेची मस्ती ही जनताच उतरवेल. त्यांना जनता माफ करणार नाही. अस स्पष्ट पणे नाना पटोले यांनी सांगितलं.केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या खोटारडेपणाला देशातील शेतकरी, बेरोजगार युवक वैतागले आहेत. निवडणूक रोखे योजना रद्द करत सर्वोच्च न्यायालयाने भाजपचा भ्रष्टाचारी चेहरा जनतेसमोर आणला आहे. येत्या निवडणुकीत जनता भाजपला जागा दाखवून देईल, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी केली. शहरात आयोजित महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी पटोले बोलत होते. शिबिरात बूथ लेव्हलपासून संघटनाबांधणी कशी करायची याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.पटोले म्हणाले, की दिल्लीमध्ये महिला कुस्तीगीर यांच्यावर लैंगिक अत्याचार झाले. महिला शोषणाचे प्रमाण वाढले आहे. केंद्रीय संस्थांचा वापर करत पक्ष फोडण्याचे आणि आमदार पळवण्याचे काम भाजप करत आहे. प्रथम भ्रष्टाचाराचे आरोप करायचे आणि नंतर त्यांना सोबत घ्यायचे असे धोरण असून, जनतेचे प्रश्न मांडणाऱ्यांवर हल्ले करायचे अशी तानाशाही व्यवस्था प्रस्थापित केली आहे. शिबिरामध्ये न सांगता गैरहजर राहिलेल्या आमदारांना पक्षाकडून करणे दाखवा नोटीस देण्यात येणार असल्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी सांगितले असल्याचे स्पष्ट केले आहे, याकडे पटोले यांनी लक्ष वेधले. दोन जातींमध्ये भांडणे लावण्यात आली असून, महाराष्ट्र जाळण्याचे पाप भाजप करत आहे. जनता निवडणुकीची वाट पाहत असून, महाराष्ट्रच मोदी सरकारला दरवाजे बंद करण्यात अग्रेसर असेल, असेही पटोले म्हणाले.

### तरुणांचे आयुष्य मोदींनी उध्वस्त केलं

» लोणावळ्यातील काँग्रेसच्या शिबिरात सात आमदार गैरहजर होते. याबाबत देखील त्यांनी खुलासा केला आहे.नाना पटोले म्हणाले, काही वैयक्तिक कारणामुळे लोणावळ्यातील शिबिरात काही आमदार येऊ शकले नाहीत. गैरहजर असलेल्या आमदारांची संख्या सात आहे. गैरहजर पदाधिकारी आणि आमदार यांना कारणे दाखवा नोटीस बजावणार आहोत. सध्या काँग्रेस पक्षातून भाजपात काही जण जाणार असल्याची शक्यता असल्याचा प्रश्न पत्रकरांनी विचारल्यानंतर, पटोले म्हणाले की, काँग्रेस पक्षाला कोण येतंय आणि कोण जातंय याने फरक पडत नाही. नवीन मतदार हे राहुल गांधींचे चाहते आहेत. तरुणांचे आयुष्य मोदींनी उध्वस्त केलं. त्यामुळे ही तरुण पिढी महाविकास आघाडीच्या पाठीशी असल्याचे ठाम मत पटोले यांनी व्यक्त केले.

# अजितदादांनी तीनवेळा शब्द देऊन पाठीत खंजीर खुपसला

## आता विधानसभेला आमचं काम केलं तरच लोकसभेला मदत करू

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आता आम्ही महायुतीत आहोत, पण महाविकास आघाडीमध्ये असताना अजित पवारांनीआम्हाला तीन वेळी शब्द दिला होता, आणि तो नंतर फिरवला, आमची फसवणूक केल्याचा थेट आरोप इंदारपूरचे भाजप नेते हर्षवर्धन पाटलांच्या कन्या अंकिता पाटलांनी दिला.**





तुम्ही आमचं विधानसभेला काम केलं तरच आम्ही लोकसभेला तुम्हाला मदत करू असंही त्या म्हणाल्या. तर काहीही झालं तरी आम्ही इंदापूरची विधानसभा लढवणारच असं वक्तव्य हर्षवर्धन पाटलांचे पुत्र राजवर्धन पाटलांनी केलंय. त्यामुळे बारामती लोकसभेच्या जागेवरून आता अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील गटामध्ये कलगीतुरा रंगल्याचं चित्र आहे. बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना यांचा उमेदवार जो असेल त्याचेच काम करावे लागेल असं अजित पवार सातत्याने म्हणत आले आहेत. आता त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार याच बारामती लोकसभेच्या उमेदवार असतील हे जवळपास निश्चित झालं आहे. मात्र ज्यांच्या त्रासाला कंटाळून भाजपमध्ये गेले त्या हर्षवर्धन पाटलांची मात्र यामुळे गोची होत असल्याचं दिसून येतंय.

### अजित पवारांनी पूर्ण तयारी

» असं असलं तरीही 2024 सालची विधानसभा आम्ही लढवणारच असं वक्तव्य हर्षवर्धन पाटलांचे पुत्र राजवर्धन पाटलांनी केलं आहे. बारामती लोकसभेसाठी अजित पवारांनी पूर्ण तयारी केली असून त्या ठिकाणी सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवार याच उभ्या असतील हे जवळपास निश्चित झालं आहे.

हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील म्हणाल्या की, या आधी आम्ही महाविकास आघाडीमध्ये होतो. त्यावेळी तीन वेळा आम्हाला शब्द देऊन तो फिरवण्यात आला, आमची फसवणूक करण्यात आली, आमच्या पाठीत खंजीर खुपसला. आता आम्ही महायुतीमध्ये आहोत. त्यामुळे विधानसभेला जे आमचे काम करतील त्यांनाच आम्ही लोकसभेला मदत करू. गेल्या विधासभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या दत्ता भरणे यांनी हर्षवर्धन पाटलांचा पराभव केला होता. हर्षवर्धन पाटलांच्या पराभवामागे अजित पवारांचा मोठा हात होता हे उघड झालं आहे. आता अजित पवार हे महायुतीत गेल्यानंतर इंदापूरच्या जागेवरून तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे.

# मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांचा संसद उत्कृष्टरत्न पुरस्काराने गौरव!

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते सत्कार





। पिंपरी ।महाईन्यूज ।

**लोकसभेतील उपस्थिती, जनहिताचे उपस्थित केलेले प्रश्न, चर्चेतील सहभाग, खासगी विधेयक आणि अनुकरणीय सर्वोत्तम कामगिरीसाठी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांना संसद उत्कृष्टरत्न पुरस्काराने दिल्लीत गौरविण्यात आले. हे केवळ मावळच्या जनतेमुळे शक्य झाले. त्यामुळे हा पुरस्कार मावळच्या जनतेला अर्पण करत असल्याची प्रतिक्रिया खासदार बारणे यांनी दिली. दरम्यान, पुरस्कार मिळाल्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही खासदार बारणे यांचा सत्कार केला.**

लोकसभेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना प्राईम पॉईंट फौंडेशनतर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या संकल्पनेतून हा पुरस्कार सुरु करण्यात आला आहे. तेलंगनाच्या राज्यपाल डॉ. तमिलीसाई सौंदरराजन, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या हस्ते खासदार बारणे यांना 17 व्या लोकसभेतील कामगिरीसाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय गृहराज्यमंत्री अजयकुमार मिश्रा, निवृत्त न्यायाधीश संजयकुमार कौल, प्राईम पॉईंट फौंडेशनचे श्रीनिवासन, प्रियदर्शनी राहुल उपस्थित होते.

चालू 17 व्या लोकसभेत खासदार बारणे यांच्या कामगिरीतील सातत्य कायम आहे. त्यांनी 635 प्रश्न विचारले आहेत. 166 चर्चामध्ये सहभाग घेतला तर, 13 खासगी विधेयके मांडली आहेत. खासदार बारणे यांची सभागृहात 94 टक्के उपस्थिती आहे. या कामगिरीसाठी त्यांना संसद उत्कृष्टरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. तर, याच संस्थेचा संसदरत्न पुरस्कार त्यांना सलग पाच वेळा प्रदान करण्यात आला आहे. महासंसद रत्न पुरस्कार, विशिष्ट संसदरत्न पुरस्कार एकवेळा मिळाला. आता विशिष्ट संसदरत्न पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला.

### लोकांमधील खासदार..

संसदेत उपस्थित राहणे, मतदारसंघातील प्रश्नांवर आवाज उठविण्याबरोबरच लोकांमध्ये मिसळणे, चोवीस तास उपलब्ध असणारे खासदार अशी श्रीरंग बारणे यांची ओळख आहे. नम्र, सतत लोकांना भेटणे, त्यांच्या अडी-अडचणींना धावून जाणे, सुख, दु:खात सहभागी होतात. दोन जिल्ह्याला जोडणारा मतदारसंघ असतानाही खासदार बारणे हे सातत्याने मतदारसंघात असतात. त्यामुळे लोकांमधील खासदार अशी बारणे यांची मतदारसंघात ओळख आहे.

### संसदेतील भाषणांबरोबच जमिनीवरही काम..

खासदार बारणे यांनी केवळ संसदेत आवाज उठविला नाही. तर, प्रत्यक्षात जमिनीवर काम देखील केले आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच मावळमधील आदिवासी पाडे, वाड्या वस्त्यांवर वीज, रस्त्यांची सुविधा निर्माण केली. गावा-गावांमधील अंतर्गत रस्ते, पाण्याची सुविधा सक्षम केली. स्व:खर्चाने पवना धरणातील गाळ काढून पिंपरी-चिंचवडकरांच्या पाण्याची सोय केली. पिंपरीत पासपोर्टचे कार्यालय सुरु केले. क्रांतिवीर चापेकर बंधुंच्या नावाने टपाल तिकिटाचे प्रकाशन केले.

### रामकृष्ण मोरे यांच्या स्मृती आप्पा बारणे यांनी ताज्या ठेवल्या – डॉ. सदानंद मोरे

» या लोक प्रतिनिधींकडून सर्वसामान्य जनतेची कामे होतात ते लोकप्रतिनिधी कायम निवडून येतात. रामकृष्ण मोरे यांनी शहरातील अनेकांना घडवले. पण त्यांच्या स्मृती ताज्या ठेवण्याचे काम फक्त आप्पांनीच केले, अशा भावना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केल्या. मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे संसदरत्न खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त लोकाभिमुख कर्तव्य संपन्न, आदर्श व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान झाला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, सिने अभिनेते अशोक समर्थ यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी डॉ. मोरे हे बोलत होते.

---

# माजी महापौर संजोग वाघेरे यांनी जपली 'सोशल रिस्पॉन्सिबिलिटी'

## वाहतूक सुरळीत करण्यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती : उपक्रमांचे कौतूक

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा संघटक आणि पिंपरी-चिंचवड शहराचे माजी महापौर संजोग वाघेरे-पाटील यांनी 'सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' जपत विधायक उपक्रम हाती घेतला आहे. आयटी पार्क हिंजवडी आणि परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी स्वयंप्रेरणेतून स्वयंसेवक (ट्राफीक वॉर्डन)ची नेमणूक करण्यात आली आहे. या उपक्रमांचे आयटीएन्स आणि सर्वसामान्य वाहनचालकांकडून कौतूक करण्यात येत आहे. हिंजवडी आयटी पार्क आणि परिसरात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. आयटी पार्क परिसरातील शिवाजी चौक आणि भूमकर चौक परिसरात सकाळी आणि संध्याकाळी मोठी वाहतूक कोंडी होते.

वाकड चौकातून शिवाजी चौकाकडे जाणारा रस्ता आणि प्रमुख चौकांत वाहनचालकांना कसरत करावी लागते. वाहनांच्या रांगा लागत असल्यामुळे वाहतूक समस्या गंभीर झाली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये वाहतूक समस्यांमुळे काही आयटी कंपन्यांचे स्थलांतर झाले आहे. पर्यावरण, रोजगार आणि नागरी आरोग्याचा विचार करता वाहतूक सक्षम करणे काळाची गरज आहे. या सोबतच सामाजिक दायित्वाच्या भावनेतून नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करणे अपेक्षीत आहे.



आयटी पार्क हिंजवडी येथे जाणाऱ्या लोकांना रोज ट्रॅफिकचा सामना करावा लागतो. त्यामुळे संजोग वाघेरे यांनी ट्रॅफिकची समस्या सोडवण्यासाठी पिंपळे सौदागर, डांगे चौक, भुमकर चौक अशा ठिकाणी ट्रॅफिक वॉर्डन नियुक्त केले आहेत. त्याचा फायदा वाहतूक पोलीस आणि वाहनचालकांनाही होत आहे.

> पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि उपलब्ध पायाभूत सोयी-सुविधा यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर प्रचंड ताण आहे. दुचाकी आणि चारचाकी अशा वाहनांचा विचार केला तर ही संख्या १६ लाखांच्या घरात आहे. त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी वाहतूक व्यवस्था विस्कळीत होते. वाहतूक कोंडी, पर्यावरण व ध्वनी प्रदूषण याबाबत वारंवार चर्चा होते. त्यामुळे स्वत: पुढाकार घ्यावा, या भावनेतून हा उपक्रम आम्ही सुरू केला आहे. – **संजोग वाघेरे,** संघटक, मावळ लोकसभा, शिवसेना

### सुरक्षित वाहतुकीची जनजागृती...

» माजी महापौर संजोग वाघेरे यांनी नियुक्त केलेल्या ट्रॉफिक वॉर्डन यांच्याकडून सुरक्षित वाहतूक आणि प्रवासासाठी जनजागृती केली जात आहे. वाहतूक नियमांचे पालन करा, हेल्मेट वापरा, लेनच्या शिस्तीचे पालन करा... असे आवाहन करणारे फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी होणारा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे, अशा भावना नागरिकांच्या आहेत.




# भारत आणि चीनमधील शह-काटशह

**मालदीव या विषयावर खूप मोठ्या प्रमाणात चर्चा झाली; पण या चर्चेतून एक पैलू काहीसा दुर्लक्षित राहिला आहे. या पैलूचेच विवेचन करण्यासाठी प्रस्तुत लेख आहे. मुळात मालदीवला चीनकडूनच प्रेरणा प्राप्त झाली असून या प्रेरणेतूनच हा छोटा देश भारताच्या विरोधात कारवाया करीत आहे, हे उघड गुपित आहे.**



सारांश, चीनला भारताच्या विरोधात हिंद महासागरात उचापती करणारा देश हवा आहे आणि मालदीवच्या विद्यमान अध्यक्षांना, म्हणजे मुइझ्झू यांना एका बाजूने इस्लामिक अतिरेक्यांना तर दुसऱ्या बाजूने चीनच्या महत्वाकांक्षी नेत्यांना डोक्यावर घेण्याची हौस आहे. परिणामत: चीनचे आव्हान भारतासाठी केवळ भूसंलग्न नव्हे तर सागर संलग्नही आहे. म्हणूनच सागरी मार्गातले शह व काटशह दृष्टीस पडत आहेत. मालदीवचा प्रश्न वर्तमानात जटिल बनला असेल, पण चीन आणि भारत एकमेकांना शह व काटशह देत आहेत हे सत्य गेल्या आठ-दहा वर्षांपासून उजेडात आले आहे. चीनने सन २०१३ पासूनच 'बेल्ट अँड रोड' उपक्रमाद्वारे अवघ्या जगाला वेढणारे खुश्कीचे आणि सागरी मार्ग बांधूनच ते सुदृढ करण्याचे ठरविले आहे. कैक देशांना सढळ हस्ते कर्जरुपाने अर्थसहाय्य करावे, अशा अर्थसहाय्यातून त्या-त्या देशांच्या विकास माफियांना साह्यभूत ठरणारे रस्ते, पूल तसेच बंदरे उभी करावीत आणि बीजिंगचे प्रभावक्षेत्र विश्वव्यापी करावे, अशी महत्वाकांक्षी व्यूहरचना चीनने अमलात आणली आहे. या व्यूहरचनेचा पहिला बळी भारत ठरला आहे. भारताच्या दक्षिणेस हिंद महासागर आहे, पण जलाशय आफ्रिकेच्या ईशान्येला भिडतो. तर याच खंडाच्या वायव्येला सिएरा लिओन देश आहे, त्या देशाच्या राजधानीत (जिबुती येथे) चीनने आपला लष्करी तळ उभा केला आहे.अरबी समुद्रातील पाकिस्तानातील ग्वादर बंदरापर्यंत आपल्या झिनजियांग प्रांताला जोडणारा महामार्ग बांधण्याचा चीनचा इरादा आहे; या मार्गाचे काम सध्या प्रगतिपथावर आहे. तो पाकव्याप्त काश्मीरमधून जातो. आपला अशा स्वरूपाच्या महामार्गाला कडवा विरोध आहे. भारताच्या पूर्वेला म्यानमार देशामधील क्यानकप्यू हे बंदरही विकसित करण्याची चीनची जिद्द आहे. या पार्श्वभूमीवर मालदीव देशात चीनने जाळे टाकून तिथल्या विद्यमान अध्यक्षांना स्वत:च्या गळास लावले आहे. म्हणजे मालदीवमधले चीनचे कारस्थान भारताला घेरण्याच्या योजनेचाच एक भाग आहे. पीत समुद्र, दक्षिण चीन समुद्र, तैवानची सामुद्रधुनी जलाशयांवर आपला हक्क आहेच. पण हिंद महासागर, अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांवरही आम्हांला स्वत:चे वर्चस्व प्रस्थापित करायचे आहे, ही चीनची आहे महत्वाकांक्षा. सुदैवाने, भारताच्या परराष्ट्र नीतीनेही चीनला काटशह देण्याचे ठरविले आहे. उदाहरणार्थ मल्लक्काच्या सामुद्रधुनीत हिंद महासागरातून ज्या चिनी मालाची आयात होते, त्याला प्रतिबंध करण्यासाठी आपण तिन्ही सैन्यदलांना अंदमान निकोबारला तैनात केले आहे. चीनने कुठल्याच महासागरातल्या जहाजांच्या वाहतुकीत विघ्न आणता कामा नये. व्हिएतनाम, फिलिपिन्स, मलेशिया एवढेच नव्हे तर तैवान या आग्नेय आशियातील देशांच्या सार्वभौम हक्कांना चीनने आव्हान देऊ नये, ही भारताची व्यूहनीती म्हणजे दिल्लीने बीजिंगला दिलेला काटशहच. चीन या सर्व देशांना स्वत:चा प्रभाव क्षेत्रातली प्यादी मानतो आहे. तेव्हां त्यांना स्वत:चे बळ मिळावे म्हणून भारताने ब्राह्मोस क्षेपणास्त्रेही त्यांना देऊ करण्यासाठी पावले उचलली आहेत. आपण फिलिपिन्सला ब्राह्मोस क्षेपणास्त्रे देत आहोत. आपल्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम अर्थसंकल्पाद्वारे भारताशी तसेच चीन या दोन्हीही देशांना साधणाऱ्या नेपाळ, भूतान, म्यानमार, अफगाणिस्तान या देशांना तसेच हिंद महासागरात पाय सोडून बसलेल्या मालदीव, सेशेल्स् मॉरिशिस, श्रीलंका यांनाही लक्षणीय अर्थसहाय्य जाहीर केले आहे. हे सर्व देश स्वावलंबी, समृद्ध व्हावेत हाच यामागचा उद्देश आहे. अर्थात आजमितीला चीनजवळ लढाऊ जहाजांची संख्या ३७० आहे. सन २०३० पर्यंत हीच संख्या ४३५ पर्यंत वाढविण्याची चीनची महत्वाकांक्षा आहे. पाणबुड्या, विमानवाहू युद्धनौका, विनाशिका असतील.

## संपादकीय »


### हेच खरे पालकत्व!

***अनेक पालकांना वाटतं, की माझ्या मुलांना सगळ्या चांगल्याच सवयी असाव्यात.***

अनेक पालकांना वाटतं, की माझ्या मुलांना सगळ्या चांगल्याच सवयी असाव्यात. मात्र, वाईट सवयी मुलांमध्ये रूजू नयेत म्हणून आपण पालक म्हणून किती आणि कसे प्रयत्न करतो, हेही तेवढंच महत्त्वाचं. लहान मुलं अगदी छोट्या गोष्टींमधून आणि बहुतांशी मुलं फक्त पालकांच्या, आपल्या वागण्यातून ते कोणती गोष्ट शिकणार आहेत, याची आपल्याला कल्पनाही नसते. हट्टीपणाबाबतही तसंच म्हणता येईल; खरं तर मुलांपेक्षा पालकच जास्त हट्टी असतात. मुलांनी या वेळी हेच करावं हा आपलाच हट्ट असतो आणि मुलांनी तसं केलं नाही तर आपण मुलांना हट्टीपणाचं लेबल चिकटवून रिकामे होतो. याप्रमाणेच मुळातच लहान मुलांना भीती म्हणजे काय हेच ठाऊक नसते, आपणच त्यांना आपले काम सोपे व्हावे म्हणून एखाद्या गोष्टीची काल्पनिक भीती तयार करतो. एकदा भीती त्यानं स्वीकारली, की नंतर आपणच त्याला भित्रा-घाबरट असं टोपण नाव ठेवून रिकामे होतो.

उत्तराखंड राज्याने नुकतीच समान नागरी संहिता (युनिफॉर्म सिव्हिल कोड) राज्यात लागू केली आहे. त्यावरून देशभरात विविध मतमतांतरे घडून आली. विशेषतः त्यातील 'लिव्ह इन' नातेसंबंधाविषयीच्या तरतुदींवरून चर्चा सुरू आहे. त्यांचे दूरगामी सामाजिक-सांस्कृतिक परिणाम असल्याने त्यातील तरतुदींची समीक्षा आवश्यक आहे.

# 'लिव्ह इन' नात्याला कायद्याचा काच




उत्तराखंड राज्याने नुकतीच समान नागरी संहिता (युनिफॉर्म सिव्हिल कोड) राज्यात लागू केली आहे. त्यावरून देशभरात विविध मतमतांतरे व्यक्त झाली. उत्तराखंडमध्ये लागू करण्यात आलेल्या समान नागरी संहितेबाबतचे प्रमुख आक्षेप हे त्यातील 'लिव्ह-इन' नातेसंबंधाबाबतचे आहेत. ते समजून घेण्याआधी समान नागरी संहिता म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे ठरते. समान नागरी संहिता म्हणजे एक असा प्रस्ताव ज्यायोगे समाजातील सर्व व्यक्तींना समान वैयक्तिक कायदा लागू होईल. जो व्यक्तीच्या धर्मावर अथवा लिंगावर आधारित असणार नाही. भारतातील कायदेव्यवस्था ही ब्रिटिश कायदेव्यवस्थेवर आधारित आहे. १८५७च्या उठावानंतर जेव्हा भारतातील शासन 'ईस्ट इंडिया कंपनी'कडून ब्रिटनच्या राणीकडे गेले तेव्हा तिने असे जाहीर केले, की ब्रिटिश कायदेमंडळ भारतातील विविध धार्मिक समूहांचे कायदे विचारात घेता, धार्मिक बाबींमध्ये कायदे करणार नाही.त्यामुळे तेव्हापासून भारतात जरी सर्वांना समान फौजदारी कायदा लागू असला तरी आजही देशामध्ये विवाह, घटस्फोट, वारसाहक्क यांबाबतचे कायदे हे त्या त्या समूहाच्या धर्मावर आधारित आहेत, ज्याला वैयक्तिक कायदा (पर्सनल लॉ) तसेच नागरी कायदा (सिव्हिल लॉ) असे म्हणतात. समान नागरी संहितेबाबतची चर्चा ही घटनेच्या निर्मितीपासूनच होत आलेली आहे. घटना समितीच्या सदस्यांमध्ये समान नागरी संहितेबाबत मतभेद होते. सुरुवातीला समान नागरी संहितेचा अंतर्भाव हा मूलभूत हक्कांमध्ये होता; परंतु ज्याची अमलबजावणी करणे राज्यसंस्थेवर बंधनकारक असणार नाही, अशा पद्धतीने तो समावेश करण्यात यावा, असा एक मतप्रवाह होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चार नोव्हेंबर १९४८ रोजी जो घटनेचा मसुदा सादर केला त्यात समान नागरी संहितेचा अंतर्भाव घटनेच्या मसुद्यायातील कलम ३५ मध्ये राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये करण्यात आला होता. या मसुद्यातील या तरतुदीला घटनासमितीच्या मुस्लिम सदस्यांचा विरोध होता. या विरोधामागे मुस्लिम सदस्यांची तीन प्रमुख करणे होती. एक, समान नागरी संहिता ही घटनेतील धार्मिक स्वातंत्र्यावर बाधा आणते. दोन, समान नागरी संहितेमुळे मुस्लिम समाजामध्ये तेढ व मतभेद होतील व तीन, वैयक्तिक कायद्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप हा त्या धर्मीयांच्या संमतीशिवाय होता कामा नये. या उलट डॉ. आंबेडकरांच्या मते समान नागरी कायदा हा काही नवा प्रस्ताव नव्हता.भारतामध्ये विवाह व वारसाहक्क वगळता बाकी सर्व बाबींमध्ये समान नागरी कायदा होता .

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा आंदोलकांना धक्का?

## मागासवर्ग आयोगाचा अहवाल न्यायालयात टिकणार नाही

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल शुक्रवारी (१६ फेब्रुवारी) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर सादर करण्यात आला. त्यानंतर येत्या मंगळवारी (२० फेब्रुवारी) विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात चर्चा करून मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याबाबतचा कायदा केला जाईल, अशी शक्यता अनेक वृत्तपत्रांनी व्यक्त केली आहे.**




तसेच कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला कायद्याच्या कसोटीवर टिकणारं आरक्षण देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. दरम्यान, मागासवर्ग आयोगाने सादर केलेला अहवाल न्यायालयात टिकणार नाही, असा दावा मागासवर्ग आयोगातील माजी सदस्य चंद्रलाल मेश्राम यांनी केला आहे.मागासवर्ग आयोगाचा अहवाल राज्य मागासवर्ग आयोगातील सदस्यांना वाचू दिला नाही, तसेच सर्वेक्षणाच्या अहवालावर सर्व सदस्यांच्या जबरदस्तीने सह्या घेतल्या गेल्या, असा गंभीर आरोप चंद्रलाल मेश्राम यांनी केला आहे. तसेच मागासवर्ग आयोगाकडून पुन्हा एकदा मराठा समाजाची फसवणूक झाली आहे, असंही मेश्राम म्हणाले. यासह मेश्राम यांनी दावा केला आहे की, मागसवर्ग आयोगाने राज्य सरकारला दिलेला अहवाल न्यायालयात टिकणार नाही. हा अहवाल कायद्याच्या कसोटीवर टिकू शकत नाही. मागासवर्ग आयोगाकडून मराठा आरक्षणाबाबत चालू असलेल्या सर्वेक्षणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आल्यानंतर चंद्रलाल मेश्राम यांची आयोगातून हकालपट्टी करण्यात आली होती. मेश्राम यांनी आयोगाचे अध्यक्ष संदीप शुक्रेंपेक्षा वेगळी भूमिका घेतल्याने ही कारवाई केली असल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, मेश्राम यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. त्यावेळी त्यांनी आयोगाच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्न उपस्थित केले.चंद्रलाल मेश्राम म्हणाले, हा आयोग २००५ च्या महाराष्ट्र मागासवर्ग आयोग अधिनियम २००५ नुसार गठित झालेला आहे. परंतु, सरकारने या आयोगाचा खिशातील बाहुलं असल्याप्रमाणे वापर केला आहे आणि हे आपलं दुर्दैव आहे. शासनाला वाटतं की, मी या आयोगात काम करण्यास अनफिट (अकार्यक्षम) आहे. अहवाल सादर करेपर्यंत मी या आयोगात काम करण्यास कार्यक्षम होतो. मग अचानक अकार्यक्षम कसा काय झालो? मी तीन वर्षे या आयोगात काम केलं. तीन वर्षे मी कसा काय कार्यक्षम होतो?मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाबाबत सादर केलेल्या अहवालाबाबत मेश्राम म्हणाले, हा अहवाल शेवटपर्यंत सदस्यांना वाचायला दिला नाही. परवा संध्याकाळी एका हॉटेलमध्ये अहवाल सादर करण्यात आला आणि सर्व सदस्यांना त्यावर सही करण्यास भाग पाडलं. मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षांनी ती बैठक बोलावली होती. त्या बैठकीला जेवढे सदस्य उपस्थित होते त्यांनी त्या काहीशा वेळात तो संपूर्ण अहवाल वाचला असेल का? त्यामुळे हा अहवाल न्यायालयात टिकणार नाही.

### अहवालात काय म्हटलंय?

» मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागासलेला असल्याने घटनेच्या १५ (४) आणि १६ (४) या अनुच्छेदानुसार हा समाज आरक्षणास पात्र ठरतो. मराठा समाजाला आरक्षण लागू केल्यावर ५० टक्क्यांची आरक्षणाची मर्यादा ओलांडली जाईल. दरम्यान, मराठा समाजाला अपवादात्मक परिस्थितीत आरक्षण देण्याची शिफारस राज्य मागासवर्ग आयोगाने केली आहे.दरम्यान, मागासवर्ग आयोगाने सादर केलेला अहवाल न्यायालयात टिकणार नाही, असा दावा मागासवर्ग आयोगातील माजी सदस्य चंद्रलाल मेश्राम यांनी केला आहे.मागासवर्ग आयोगाचा अहवाल राज्य मागासवर्ग आयोगातील सदस्यांना वाचू दिला नाही, तसेच सर्वेक्षणाच्या अहवालावर सर्व सदस्यांच्या जबरदस्तीने सह्या घेतल्या गेल्या, असा गंभीर आरोप चंद्रलाल मेश्राम यांनी केला आहे. तसेच मागासवर्ग आयोगाकडून पुन्हा एकदा मराठा समाजाची फसवणूक झाली आहे, असंही मेश्राम म्हणाले. यासह मेश्राम यांनी दावा केला आहे की, मागसवर्ग आयोगाने राज्य सरकारला दिलेला अहवाल न्यायालयात टिकणार नाही. हा अहवाल कायद्याच्या कसोटीवर टिकू शकत नाही.मागासवर्ग आयोगाकडून मराठा आरक्षणाबाबत चालू असलेल्या सर्वेक्षणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आल्यानंतर चंद्रलाल मेश्राम यांची आयोगातून हकालपट्टी करण्यात आली होती. मेश्राम यांनी आयोगाचे अध्यक्ष संदीप शुक्रेंपेक्षा वेगळी भूमिका घेतल्याने ही कारवाई केली असल्याचं बोललं जात आहे.

# मोदींना पंतप्रधान करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे!

## शिवसेनेच्या अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आवाहन

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोट्यवधी हिंदूंचे राम मंदिराचे स्वप्न, काश्मीरमधील ३७० कलम हटवणे यांसारखे निर्णय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पाहिले असते, तर त्यांनी मोदींचे मुक्तकंठाने अभिनंदन केले असते. कौटुंबिक वारसा सांगत आहेत त्यांनी विचार बदलला आहे. यामुळे ते याबद्दल एक शब्दही उच्चारत नाहीत. बाळासाहेबांचा वारसा, हिंदूत्व हे सांगण्याचा नैतिक अधिकारच तुम्हाला नाही, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.**



तसेच देशाच्या आणि त्यासोबतच महाराष्ट्राच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केंद्रात तिसऱ्यांदा सत्तेत आणण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागण्याचे आवाहन केले.कोल्हापूर येथे कालपासून शिवसेनेचे (शिंदे गट) दोन दिवसीय राज्यव्यापी अधिवेशन सुरू होते. आज या अधिवेशनाची सांगता झाली. आज दिवसभर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह पक्षाच्या विविध नेत्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. यामध्ये सर्वच नेत्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विजयासह देशात मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागण्याचे आवाहन केले.

या अधिवेशनात काल मंजूर केलेल्या ठरावांमध्ये भाजपच्या गौरवाचे ठराव प्रामुख्याने होते. त्यापाठोपाठ आज अखेरच्या दिवशीही भाषणांमध्ये केंद्रात भाजपच्या गौरवाचाच प्रभाव दिसून आला.

### 45 जागा जिंकण्याचे उद्दिष्ट

» शिंदे म्हणाले, की आपण अधिवेशनात शेतकऱ्यांचे, गरजूंचे ठराव घेतले. बाळासाहेब ठाकरे आणि कोट्यवधी हिंदूंचे राम मंदिराचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पूर्ण केले आहे. आपण त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्तावही सादर केला. नरेंद्र मोदी यांना पुन्हा केंद्रात सत्ता सोपवणे आवश्यक असल्याचे सांगत शिंदे म्हणाले, की लोकसभा निवडणुकीमध्ये ४०० हून अधिक जागा आणि महाराष्ट्रातून किमान ४५ जागा जिंकण्याचे उद्दिष्ट आपण ठेवलेले आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली हे शक्य असून, त्यासाठी आपला पक्ष आणि प्रत्येक शिवसैनिकालाही आपले योगदान द्यावे लागणार आहे.बाळासाहेबांचा वारसा, हिंदूत्व हे सांगण्याचा नैतिक अधिकारच तुम्हाला नाही, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.

# कमलनाथ भाजपाच्या वाटेवर?

## कमलनाथांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चेवर काँग्रेसची पहिली प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणूक तोंडावर आलेली असताना काँग्रेसला मोठमोठे धक्के बसत आहेत. वेगवेगळ्या राज्यांमध्ये त्यांच्या अनेक शिलेदारांनी काँग्रेसला रामराम करत भाजपात प्रवेश केला आहे. चार दिवसांपूर्वी महाराष्ट्रात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केला. त्यानंतर आता मध्य प्रदेशमध्येही काँग्रेसला खिंडार पडणार असल्याची चर्चा आहे. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि राज्यातील प्रमुख काँग्रेस नेते कमलनाथ हे भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू झाली आहे.**



कमलनाथ आणि त्यांचे पूत्र नकुलनाथ हे काँग्रेस नेतृत्वावर नाराज असल्याच्या बातम्या गेल्या काही दिवसांपासून पाहायला मिळत होत्या. अशातच मध्य प्रदेश भाजपा प्रवक्ते आणि कमलनाथ यांचे माजी माध्यम सल्लागार नरेंद्र सलूजा यांनी कमलनाथ आणि नकुलनाथ यांचे काही फोटो एक्स या मायक्रोप्लॅगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केले आहेत. तसेच या फोटोंसह 'जय श्री राम' असं कॅप्शन दिलं आहे. दरम्यान, नकुलनाथ यांनी त्यांच्या समाजमाध्यमांवरील प्रोफाईल बायोमधून काँग्रेससंबंधीची माहिती हटवली आहे. त्यामुळे नाराजीच्या चर्चांना आणखी जोर आला. तसेच कमलनाथ आणि नकुलनाथ दुपारी दिल्लीला रवाना झाले होते. त्यामुळे ते पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देण्यासाठी दिल्लीला जात असल्याच्या बातम्या काही वृत्तवाहिन्यांनी प्रसिद्ध केल्या होत्या. या सर्व गदारोळामुळे मध्य प्रदेश काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.दरम्यान, मध्य प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जीतू पटवारी यांना या चर्चांवर भाष्य करावं लागलं. पटवारी यांनी कमलनाथ यांच्याबाबत पसरत असलेल्या अफवांचं खंडण केलं. तसेच ते म्हणाले, कमलनाथ कुटुंब आणि गांधी कुटुंबातली केमिस्ट्री आम्ही आणि संपूर्ण देशाने पाहिली आहे. १९८० मध्ये कमलनाथ पहिल्यांदा निवडणूक लढले होते, तेव्हा इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या की कमलनाथ माझा तिसरा मुलगा आहे. इंदिरा गांधी कमलनाथांना उल्लेख तिसरा मुलगा असा केला होता. त्यापुढे जाऊन गेल्या ४५ वर्षांपासून कमलनाथ यांनी काँग्रेसचा झेंडा खांद्यावर घेऊन संघर्ष केला आहे. ४५ वर्षांच्या राजकीय प्रवासात मध्य प्रदेशमधील प्रमुख काँग्रेस नेते म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहत आलो आहोत. तेदेखील आम्हा सर्व कार्यकर्त्यांच्या खांद्याला खांदा लावून, सुख-दुःखात सर्वांना आपल्याबरोबर घेऊन पुढे जात राहिले. त्यांनी काँग्रेसचे विचार दृढतेने मांडले. जीतू पटवारी म्हणाले, कमलनाथ यांनी संघर्षाच्या काळात बेडरपणे काम केलं. ज्योतिरादित्य सिंधिया यांनी काँग्रेसचं सरकार पाडलं तेव्हादेखील आम्ही सगळे कमलनाथ नावाच्या या एका छताखाली एकत्र आलो. मला एकच सांगायचं आहे की, कमलनाथ यांच्याबाबत ज्या बातम्या आणि अफवा पसरत आहेत त्या निराधार आहेत. त्यांना काहीही अर्थ नाही. कमलनाथ कधीही पक्ष सोडण्याचा विचार करणार नाहीत. तुम्हीदेखील कधी असा विचार कराल का? इंदिरा गांधींचा तिसरा मुलगा काँग्रेस सोडेल का? काँग्रेस सोडण्याचा विचार त्यांच्या स्वप्नातही आला नसेल.मध्य प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते म्हणाले, काही महिन्यांपूर्वी आम्ही सर्व काँग्रेस कार्यकर्ते, नेते, पदाधिकारी कमलनाथ यांच्या नेतृत्वात मध्य प्रदेशची विधानसभा निवडणूक लढलो. कमलनाथ यांना मुख्यमंत्री बनवण्यासाठी आम्ही संघर्ष केला, रस्त्यावर उतरलो, आंदोलनं आणि प्रचार केला. त्यांच्यासाठी आम्ही इतकं सगळं केलं आणि आता ते आम्हाला सोडून जातील? मला नाही वाटत की ते आम्हाला सोडून भाजपात जातील. त्यांच्याबाबत पसरत असलेल्या सर्व अफवांचं मी खंडण करतो आणि पुन्हा एकदा स्पष्ट करतो की, कमलनाथ काँग्रेसमध्येच राहतील.कमलनाथ आणि त्यांचे पूत्र नकुलनाथ हे काँग्रेस नेतृत्वावर नाराज असल्याच्या बातम्या गेल्या काही दिवसांपासून पाहायला मिळत होत्या.

### कमलनाथ माझा तिसरा मुलगा

» अशातच मध्य प्रदेश भाजपा प्रवक्ते आणि कमलनाथ यांचे माजी माध्यम सल्लागार नरेंद्र सलूजा यांनी कमलनाथ आणि नकुलनाथ यांचे काही फोटो एक्स या मायक्रोप्लॅगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केले आहेत. तसेच या फोटोंसह 'जय श्री राम' असं कॅप्शन दिलं आहे. दरम्यान, नकुलनाथ यांनी त्यांच्या समाजमाध्यमांवरील प्रोफाईल बायोमधून काँग्रेससंबंधीची माहिती हटवली आहे. त्यामुळे नाराजीच्या चर्चांना आणखी जोर आला. तसेच कमलनाथ आणि नकुलनाथ दुपारी दिल्लीला रवाना झाले होते. त्यामुळे ते पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देण्यासाठी दिल्लीला जात असल्याच्या बातम्या काही वृत्तवाहिन्यांनी प्रसिद्ध केल्या होत्या. या सर्व गदारोळामुळे मध्य प्रदेश काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.दरम्यान, मध्य प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जीतू पटवारी यांना या चर्चांवर भाष्य करावं लागलं. पटवारी यांनी कमलनाथ यांच्याबाबत पसरत असलेल्या अफवांचं खंडण केलं. तसेच ते म्हणाले, कमलनाथ कुटुंब आणि गांधी कुटुंबातली केमिस्ट्री आम्ही आणि संपूर्ण देशाने पाहिली आहे. १९८० मध्ये कमलनाथ पहिल्यांदा निवडणूक लढले होते, तेव्हा इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या की कमलनाथ माझा तिसरा मुलगा आहे. इंदिरा गांधी कमलनाथांना उल्लेख तिसरा मुलगा असा केला होता.

# 'मला मृत्यूदंड द्या, मी मतमोजणीत गडबड केली

## पाकिस्तानी वरिष्ठ निवडणूक अधिकाऱ्याचे गंभीर आरोप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तानच्या निवडणुकीत गडबड झाल्याची माहिती समोर येत आहे. एका वरिष्ठ निवडणूक अधिकाऱ्याने शनिवारी याची कबुली दिली. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त आणि सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांच्यावर निवडणुकीत गडबड केल्याचे आरोप केले आहेत.**

तसेच निवडणुकीत झालेल्या चुकीच्या कामांची जबाबदारी स्वतःवर घेऊन त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. रावळपिंडीचे माजी आयुक्त लियाकत अली चट्टा यांची ही भूमिका महत्त्वाची मानली जाते. इम्रान खान यांच्या पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ या पक्षाने निवडणुकीत गडबड-गोंधळ झाल्याचा आरोप केला होता. लोकांनी दिलेला कौल चोरल्याबद्दल त्यांच्या पक्षाने देशभरात आंदोलन सुरू केले आहे.रावळपिंडी येथे पत्रकारांशी बोलताना लियाकत अली चट्टा म्हणाले की, निवडणुकीत जे उमेदवार पराभूत होत होते, त्यांना आम्ही विजयी केले. मी या सर्व अफरातफरीची जबाबदारी




घेतो. मुख्य निवडणूक आयुक्त आणि सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश या सर्व प्रकारात सामील आहेत, डॉन वृत्तपत्राने जाहीर केले आहे.लियाकत अली चट्टा पुढे म्हणाले की, देशाच्या पाठीत खंजीर खुपसल्यामुळे मला रात्रीची झोपही येत नाही. मी जे चुकीचे काम केले, त्याची शिक्षा मला मिळाली पाहीजे. तसेच या गुन्ह्यात जे अन्य लोक सहभागी आहेत, त्यांच्यावरही कारवाई झाली पाहीजे. तसेच चट्टा पुढे म्हणाले की, माझ्यावर खूप दबाव होता. ज्यामुळे मी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण नंतर हिंमत करून त्यांनी जनतेसमोर सर्व सत्य सांगण्याचा प्रयत्न केला. "माझे नोकरशाहीला आवाहन आहे की, या राजकीय नेत्यांसाठी कोणतेही चुकीचे काम करून नका.

### निवडणुकीत गडबड केल्याचे आरोप

» दरम्यान पाकिस्तानच्या मुख्य निवडणूक आयोगाने लियाकत अली चट्टा यांनी केलेल्या आरोपांचे खंडन केले आहे. एका निवेदनाद्वारे म्हटले की, रावळपिंडीचे निवडणूक अधिकारी लियाकत अली चट्टा यांनी निवडणूक आयोग किंवा निवडणूक आयुक्तांवर जे बिनबुडाचे आरोप केले, त्याचा आम्ही विरोध करतो. निवडणुकीचे निकाल बदलले जावेत, यासाठी निवडणूक आयोगाने कोणतेही निर्देश दिलेले नाहीत.पाकिस्तानच्या निवडणुकीत गडबड झाल्याची माहिती समोर येत आहे. एका वरिष्ठ निवडणूक अधिकाऱ्याने शनिवारी याची कबुली दिली. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त आणि सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांच्यावर निवडणुकीत गडबड केल्याचे आरोप केले आहेत.

# ईशा देओलच्या घटस्फोटावर धर्मेंद्र यांनी पहिल्यांदाच दिली प्रतिक्रिया

ईशा देओल बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर ईशाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सध्या ईशा अभिनयापासून लांब असली तरी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. अभिनयाव्यतिरिक्त ईशा आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असते. लग्नाच्या ११ वर्षांनंतर ईशा पती भरत तख्तानीबरोबर घटस्फोट घेणार आहे. ईशा व भरत परस्पर संमतीने विभक्त होत आहेत. ईशाने सांगितले की, तिने मुलांचा विचार करूनच हा निर्णय घेतला आहे. ईशाच्या या निर्णयाने वडील धर्मेंद्र यांना मोठा धक्का बसला आहे. नुकतीच त्यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, 'धर्मेंद्र ईशा व भरत तख्तानी यांच्या वेगळे होण्याच्या



विरोधात नाहीत, पण ईशाने तिच्या निर्णयावर पुनर्विचार करावा अशी त्यांची इच्छा आहे. ईशा आणि भरत दोघेही धर्मेंद्र यांचा खूप आदर करतात. भरत देओल कुटुंबासाठी मुलासारखा आहे, तर ईशा नेहमी आनंदी राहावी अशी धर्मेंद्र यांची इच्छा आहे. मात्र, घटस्फोटाचा परिणाम ईशा आणि भरतच्या मुलींवरही होईल, त्यामुळेच त्यांनी त्यांच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी धर्मेंद्र यांची इच्छा आहे. एवढंच नाही तर मुलींसाठी जर हे लग्न वाचवता आलं तर ईशा व भरत यांनी आपला घटस्फोटाचा निर्णय मागे घ्यावा, असे मतही त्यांनी व्यक्त केले आहे. तर घटस्फोटाच्या ईशाच्या या निर्णयानंतर हेमा मालिनी लेकीच्या पाठिशी खंबीरपणे उभ्या आहेत. अद्याप त्यांनी या प्रकरणावर कोणतेही भाष्य केले नसले तरी ईशाच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## संतोषींना दोन वर्षांचा तुरुंगवास

बॉलिवूडचे दिग्गज दिग्दर्शक अशी ओळख असलेल्या राजकुमार संतोषी यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. जामनगर न्यायालयाने त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. चेक बाऊन्स प्रकरणात ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. राजकुमार संतोषी यांनी दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावत असताना चेकच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून जमा करण्याचेही आदेश दिले आहेत.राजकुमार संतोषी यांनी घायल, घातक यांसारख्या सिनेमांचं दिग्दर्शन केलं आहे. संतोषी यांनी जामनगरचे व्यावसायिक अशोकलाल यांच्याकडून एक कोटी रुपये घेतले होते. मात्र ते पैसे परतच केले नाहीत. यानंतर अशोकलाल हे राजकुमार संतोषींच्या विरोधात न्यायालयात गेले. ज्यानंतर जामनगर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.राजकुमार संतोषी यांचं चेक बाऊन्सचं हे प्रकरण २०१५ मधलं आहे.

## राधिकाचा 'तो' व्हिडीओ व्हायरल



राधिका आपटे ही हिंदी आणि मराठी सिनेसृष्टीत तसंच वेब सीरिजमध्ये काम करणारी एक नावाजलेली अभिनेत्री आहे. तसंच तिने आत्तापर्यंत काही दाक्षिणात्य सिनेमांमध्येही काम केलं आहे. सुपरस्टार रजनीकांत यांच्यासह ती 'कबाली' या सिनेमात झळकली होती. सध्याच्या घडीला राधिका आपटेचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत तिने दाक्षिणात्य सिनेसृष्टीवर भाष्य केलं आहे. राजीव मसंद यांनी घेतलेलेल्या मुलाखतीतला हा व्हिडीओ आहे.राधिका आपटेचा एक जुना व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओत राधिका पत्रकार राजीव मसंद यांच्याशी संवाद साधताना दिसत आहे. तिने तेलुगू सिनेसृष्टीबद्दल भाष्य केलं आहे. राधिका म्हणते,"तेलुगू सिनेसृष्टीत अर्थात टॉलिवूडमध्ये मला सर्वात जास्त संघर्ष करावा लागला. टॉलिवूड पितृसत्ताक आणि पुरुषप्रधान आहे. सिनेमांत महिलेला चांगला दर्जा देत असले तरी प्रत्यक्षात सेटवर मात्र वेगळं चित्र पाहायला मिळतं. पुरुष कलाकारांकडून महिला कलाकारांना देण्यात येणारी वागणूक वेगळी आहे."राधिका आपटेचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केलं आहे. तुझ्या अशा वागण्यामुळेच टॉलिवूडला तुझी गरज नाही, टॉलिवूडनेच 'बाहुबली', 'पुष्पा' आणि 'ॲनिमल'सारखे ब्लॉकबस्टर सिनेमे बॉलिवूडला दिले आहेत. एक वाईट अनुभव संपूर्ण इंडस्ट्रीबद्दल कसा काय असू शकतो? तेलुगू इंडस्ट्रीला बदनाम करण्याचा प्रयत्न, काही लोकांमुळे संपूर्ण इंडस्ट्रीला चुकीचं ठरवू नये, अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत आणि राधिकाला ट्रोल केलं आहे.राधिका आपटे ही वेबसीरिज, हिंदी चित्रपटसृष्टी, मराठी चित्रपटसृष्टी आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत नावाजलेली अभिनेत्री आहे. सेक्रेड गेम्स या सीरिजमध्ये तिने साकारलेली अंजली माथूर या रॉ एजंटची भूमिका प्रेक्षकांच्या अजूनही स्मरणात आहे.

## 'दंगल' फेम सुहानी भटनागरचं निधन

आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटात भूमिका साकारणारी अभिनेत्री सुहानी भटनागर हिचं १६ फेब्रुवारीला दिल्लीत निधन झालं. ती फक्त १९ वर्षांची होती. अभिनेत्रीच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीयांसह तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला. गेल्या दोन महिन्यांपासून तिच्यावर रुग्णालयात उपचार चालू होते. सुहानी एका दुर्मिळ आजाराशी झुंज देत होती. तिच्या निधनाची पुष्टी आमिर खानच्या प्रोडक्शन हाऊसने केली आहे. याशिवाय अभिनेत्रीच्या पालकांनी मीडियाशी संवाद साधताना सुहानीला नेमकं काय झालं होतं याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे.सुहानीचे वडील मीडियाशी संवाद साधताना म्हणाले, "दोन महिन्यांपूर्वी तिच्या हाताला सूज येऊ लागली. सुरुवातीला आम्हाला या गोष्टी अतिशय सामान्य वाटल्या पण, कालांतराने तशीच सूज तिच्या दुसऱ्या हाताला आली. त्यानंतर संपूर्ण शरीरात ही सूज पसरली. अनेक डॉक्टरांचा सल्ला घेऊनही कोणालाही या आजाराचं निदान झालं नाही. शेवटी ११ दिवसांपूर्वी आम्ही तिला एम्समध्ये दाखल केलं.""सुहानीला रुग्णालयात दाखल केल्यावर तिच्या अनेक चाचण्या करण्यात आल्या. यामधून तिला डर्माटोमायोसिटिस हा दुर्मिळ आजार झाल्याचं समोर आलं. या आजारावर स्टेरॉईड्स हा एकमेव उपचार आहे. परंतु, याच स्टेरॉईड्समुळे तिच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम झाला आणि दिवसेंदिवस ती कमकुवत झाली." असं सुहानीच्या वडिलांनी सांगितलं.आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटात छोट्या बबिता फोगाटची भूमिका साकारणारी अभिनेत्री सुहानी भटनागर हिचं अवघ्या १९ व्या वर्षी निधन झालं आहे. अभिनेत्रीच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीयांसह तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.



## रकुल प्रीत सिंग व जॅकी सिद्धिविनायकाच्या चरणी

अभिनेत्री रकुल प्रीत सिंग आणि अभिनेता जॅकी भगनानी लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. त्यामुळे सध्या दोघांचं कुटुंब लग्नाच्या तयारीत व्यग्र आहे. हळदी, मेहंदी, संगीत, सप्तपदी असं समारंभपूर्वक लग्नसोहळा रकुल व जॅकीचा असणार आहे. २१ फेब्रुवारीला गोव्यात जवळच्या नातेवाईकांच्या उपस्थित हा लग्नसोहळा पार पडणार आहे. लग्नाआधी रकुल व जॅकीचं देवदर्शन सुरू झालं आहे. नुकतंच दोघांनी सिद्धिविनायकाचं दर्शन घेतलं. याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. रकुल प्रीत सिंग आणि जॅकी भगनानी यांचा मुंबईतील सिद्धिविनायकाच्या मंदिराबाहेरील व्हिडीओ 'फिल्मी ग्यान' या एंटरटेनमेंट इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. यावेळी रकुलने फिकट गुलाबी रंगाचा ड्रेस परिधान केला होता. तर जॅकी कुर्ता व पँटमध्ये पाहायला मिळाला. बाप्पाचं दर्शन घेतल्यानंतर रकुल व जॅकी पापाराझींना पोझ देताना दिसत आहेत. यादरम्यान दोघांना पाहण्यासाठी चाहत्यांनी एकच गर्दी केली होती.१९ फेब्रुवारी रकुल व जॅकीच्या लग्नसोहळ्याला सुरुवात होणार आहे. हळदी, मेहंदी आणि संगीत हे समारंभ १९ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. मुंबई व गोवा या दोन्ही ठिकाणी समारंभ होणार आहेत. १५ फेब्रुवारीला रकुल व जॅकीची ढोल नाइट समारंभ पार पडला. यावेळी जॅकीच्या घरी हिरव्या रंगाचा शरारा घालून अभिनेत्री गेली होती.

# पुजाराने झळकावले दमदार शतक!

## चेतेश्वर पुजाराने टीम इंडियात परतण्याचे दिले संकेत

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**भारतीय कसोटी संघातून वगळलेला अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजारा आपल्या उत्कृष्ट कामगिरीने निवडकर्त्यांना सतत आठवण करून देत आहे की, त्याला दीर्घकाळ संघाबाहेर ठेवता येणार नाही. पुजारा सध्याच्या रणजी ट्रॉफी हंगामात सातत्याने धावा करत आहे. पुजाराने मणिपूरविरुद्ध शानदार शतक झळकावले. त्याने १०५ चेंडूत १२ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने १०८ धावा केल्या. अशा प्रकारे राजकोटमध्ये पुजाराची 'बॅझबॉल' शैली पाहायला मिळाली.**



याआधी मागच्या सामन्यातही त्याने राजस्थानविरुद्ध पहिल्या डावात शतक झळकावले होते. चेतेश्वर पुजाराने राजकोटच्या सनोसारा क्रिकेट मैदानावर आपल्या प्रथम श्रेणी क्रिकेट कारकिर्दीतील ६३ वे शतक झळकावले. पुजाराने १०२ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. पुजाराच्या संथ स्ट्राईक रेटवर नेहमीच टीका होत असते, पण आजची खेळी पाहून त्याच्या टीकाकारांचीही तोंडे बंद झाली असतील.या वर्षी, पुजाराने रणजी ट्रॉफीमध्ये २४३*, ४९, ४३, ४३, ६६, ९१, ३, ०, ११०, २५ आणि १०८ धावा खेळल्या आहेत. पुजाराच्या या खेळी पाहता तो भारतीय संघात पुनरागमन करण्यास पात्र असल्याचे स्पष्ट होते. मागील सामन्यापूर्वी त्याने ७ सामन्यात ६७३ धावा केल्या होत्या. या काळात त्याची सरासरी ७७ होती.पहिल्या डावात मणिपूरला १४२ धावांत गुंडाळल्यानंतर सौराष्ट्राने पहिला डाव ६ गडी बाद ५२९ धावांवर घोषित केला. सौराष्ट्रासाठी पहिल्या डावात चेतेश्वर पुजारासह कर्णधार अर्पित वसावडा आणि प्रेरक मंकड यांनी शतकी खेळी खेळली. अर्पितने १९७ चेंडूत १४८ धावा केल्या. तर प्रेरकने १७३ चेंडूत १७३ धावा केल्या. दुसऱ्या डावात मणिपूरची अवस्था वाईट आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत मणिपूरने दुसऱ्या डावात ५५ धावांत ३ विकेट गमावल्या आहेत.चेतेश्वर पुजाराने या रणजी मोसमात झारखंडविरुद्ध नाबाद २४२ धावा केल्या होत्या. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या भारतीयांमध्ये पुजारा तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. या यादीत दिग्गज सुनील गावस्कर आणि सचिन तेंडुलकर संयुक्तपणे पहिल्या क्रमांकावर आहेत. या दोघांच्या नावावर ८१-८१ शतके आहेत, तर दुसऱ्या स्थानावर राहुल द्रविड आहे. ज्याने 68 शतके केली आहेत.पुजाराच्या या खेळी पाहता तो भारतीय संघात पुनरागमन करण्यास पात्र असल्याचे स्पष्ट होते. भारतीय कसोटी संघातून वगळलेला अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजारा आपल्या उत्कृष्ट कामगिरीने निवडकर्त्यांना सतत आठवण करून देत आहे की, त्याला दीर्घकाळ संघाबाहेर ठेवता येणार नाही. पुजारा सध्याच्या रणजी ट्रॉफी हंगामात सातत्याने धावा करत आहे. पुजाराने मणिपूरविरुद्ध शानदार शतक झळकावले. त्याने १०५ चेंडूत १२ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने १०८ धावा केल्या. अशा प्रकारे राजकोटमध्ये पुजाराची 'बॅझबॉल' शैली पाहायला मिळाली.याआधी मागच्या सामन्यातही त्याने राजस्थानविरुद्ध पहिल्या डावात शतक झळकावले होते. चेतेश्वर पुजाराने राजकोटच्या सनोसारा क्रिकेट मैदानावर आपल्या प्रथम श्रेणी क्रिकेट कारकिर्दीतील ६३ वे शतक झळकावले. पुजाराने १०२ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. पुजाराच्या संथ स्ट्राईक रेटवर नेहमीच टीका होत असते, पण आजची खेळी पाहून त्याच्या टीकाकारांचीही तोंडे बंद झाली असतील.या वर्षी, पुजाराने रणजी ट्रॉफीमध्ये २४३*, ४९, ४३, ४३, ६६, ९१, ३, ०, ११०, २५ आणि १०८ धावा खेळल्या आहेत. मागील सामन्यापूर्वी त्याने ७ सामन्यात ६७३ धावा केल्या होत्या. या काळात त्याची सरासरी ७७ होती.पहिल्या डावात मणिपूरला १४२ धावांत गुंडाळल्यानंतर सौराष्ट्राने पहिला डाव ६ गडी बाद ५२९ धावांवर घोषित केला.

### पुजाराने नाबाद 242 धावा केल्या

सौराष्ट्रासाठी पहिल्या डावात चेतेश्वर पुजारासह कर्णधार अर्पित वसावडा आणि प्रेरक मंकड यांनी शतकी खेळी खेळली. अर्पितने १९७ चेंडूत १४८ धावा केल्या. तर प्रेरकने १७३ चेंडूत १७३ धावा केल्या. दुसऱ्या डावात मणिपूरची अवस्था वाईट आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत मणिपूरने दुसऱ्या डावात ५५ धावांत ३ विकेट गमावल्या आहेत. दुसऱ्या डावात मणिपूरची अवस्था वाईट आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत मणिपूरने दुसऱ्या डावात ५५ धावांत ३ विकेट गमावल्या आहेत.चेतेश्वर पुजाराने या रणजी मोसमात झारखंडविरुद्ध नाबाद २४२ धावा केल्या होत्या.

# ५० पेक्षा जास्त सरासरी राखणारे दिग्गज कसोटी फलंदाज

## विराटला कधी आक्रमक व्हायचं, कधी आदर द्यायचा हे त्याला कळतं

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**विराट कोहली हे नाव गेले दीड दशक अक्षरशः धावांची टांकसाळ उघडून आहे. तो खेळायला उतरणं म्हणजे धावांची हमी आहे. तो विकेट टाकत नाही. तो प्रत्येक धावेचं मोल जाणतो. एकेका धावेसाठी जीव तोडून पळतो. मैदानाच्या खाचाखोचांची त्याला पक्की जाण असते. कोणाला लक्ष्य करायचं हे त्याला माहिती असतं. कुठे फटका लगावला, तर चौकार-षटकार मिळतील याचं त्याचं गणित चोख असतं. कधी आक्रमक व्हायचं, कधी आदर द्यायचा हे त्याला कळतं. तो ऑटो पायलट मोडवर खेळतो.**

त्याची बॅट तळपली की, संघ जिंकतो. तो दमत नाही, कंटाळत नाही. त्याची धावांची भूक भस्म्या ड्रॅगनची आहे. त्यामुळे त्याचं संघात नसणं किंवा त्याची बॅट रुसणं मनाला वेदना देतं. करोना काळात अडीच वर्षं त्याची बॅट म्यान झाली होती. शतक त्याला दूर ठेवत होतं. पन्नाशीपल्याड सरासरी मळवट अभिमानाने फडकत असे. पण, मधल्या काळात त्याच्या बॅटमधून धावांचा ओघ कमी झाला. सरासरी ५० च्या खाली गेली. खरं तर शेकडो सामने खेळल्यावरही सरासरी ५० च्या घरात आहे हे विलक्षण सातत्याचं द्योतक; पण मोठ्या खेळाडूंना मोठी शिखरं साद घालतात. सरासरी अर्धशतकाच्या पल्याड आहे का अल्याड यानं कोहलीच्या कर्तृत्वसिद्धतेत



तसूभरही फरक पडत नाही. आधुनिक क्रिकेटचा शिलेदार ही बिरुदावली त्याच्या नावाला शोभून दिसते.२०१९ पूर्वी विराटची कसोटी सरासरी ही ५८ पेक्षा जास्त होती. परंतु, आता ही सरासरी ५० पेक्षा कमी झाली आहे. या गोष्टीची खूप चर्चा झाली. विराटच्या कामगिरीत सातत्य नसल्याची टीकाही झाली. परंतु, कसोटी क्रिकेटमध्ये ५० च्या सरासरीला इतकं महत्त्व का दिलं जातं, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. तसेच जगात असे काही महान कसोटी फलंदाज आहेत; ज्यांची कसोटीतली सरासरी ५० पेक्षा कमी आहे. तरीदेखील जगातल्या महान फलंदाजांमध्ये त्यांचं नाव घेतलं जातं. या लेखात आपण या महान फलंदाजांबद्दल आणि कसोटी क्रिकेटमधील खेळाडूंच्या सरासरीबाबत ऊहापोह करणार आहोत.एखादा फलंदाज आणि गोलंदाजाच्या कारकिर्दीत शतक आणि फायफर (एका डावात पाच बळी) महत्त्वाचे असतात, त्याचप्रमाणे कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजाची सरासरी ५० किंवा त्याहून अधिक असेल.

### फलंदाजांची खरी परीक्षा

त्याचा अर्थ तो फलंदाज सातत्याने धावा करतोय, असा होतो. ५० ची सरासरी ही एखाद्या फलंदाजाच्या सातत्यूर्ण कामगिरीचं द्योतक मानली जाते. एखाद्या फलंदाजाची एक-दोन मालिकांत किंवा वर्षभर ७०-८० किंवा त्याहून अधिक सरासरी असू शकते. परंतु, एखाद्या खेळाडूनं ५० किंवा त्याहून अधिक कसोटी सामने खेळल्यानंतरही त्याची सरासरी ५० पेक्षा जास्त राखली असेल, तर त्याचा अर्थ तो सातत्याने धावा करणारा फलंदाज आहे, असं मानलं जातं. अशी सरासरी राखण्यासाठी फलंदाजाला त्याच्या मायदेशात आणि विदेशांत प्रतिस्पर्धी संघाच्या मैदानावर स्वतःला सिद्ध करावं लागतं. आव्हानात्मक खेळपट्ट्यांवर, दर्जेदार गोलंदाजीसमोर फलंदाजांची खरी परीक्षा होते.